
www.dainikmahabharat.com RNI No. MAHMAR/2015/64418 jaymahabharat2015@gmail.com




# दैनिक महाभारत




संपादक – विजयकुमार वाव्हळ

महाराष्ट्र ● बीड (महाराष्ट्र) ●दैनिक ●मराठी ●वर्ष – १० ●अंक २५९ ● गुरूवार दि.०१ मे २०२५ ● किंमत २ रू. ● पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक


सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळवणाऱ्या धनिक आणि संस्थानिक असणाऱ्या राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा.
सुषमाताई अंधारे



पहलगाम आतंकी हमले को लेकर सभी पार्टियों को एकजुट होकर सरकार के हर कदम के साथ खड़े होना चाहिए, ना कि इसकी आड़ में पोस्टरबाजी व बयानबाजी आदि के जरिए घिनौनी राजनीति की जानी चाहिए, क्योंकि इससे लोगों में कन्फ्यूज़न पैदा हो रहा है, जो देशहित में ठीक नहीं।
मायावती



सामाजिक न्याय के लिए संकल्पित मोदी सरकार ने आज एक ऐतिहासिक निर्णय लिया है।प्रधानमंत्री श्री परीशपवीरोवळ जी के नेतृत्व में आज हुई उउझ– की बैठक में, आगामी जनगणना में जातिगत गणना को शामिल करने का निर्णय लेकर सामाजिक समानता और हर वर्ग के अधिकारों के प्रति मजबूत प्रतिबद्धता का संदेश दिया गया है।
अमित शाह



जात निहाय जनगणना करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात केंद्र सरकार ने घेतलेला निर्णय. क्रांतिकारक आहे. जात निहाय जन गणने च्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. कॉंग्रेस ने त्यांच्या सत्ताकाळात हा निर्णय घेण्याची हिंमत दाखवली नाही आता राहुल गांधींनी यावर टीका करू नये.
रामदास आठवले



## मनोज जरांगेंचे पुन्हा ‘चलो मुंबई’

**मराठा आरक्षणासाठी २९ ऑगस्टला उपोषण सुरु करणार; शेतकऱ्यांना कामे उरकण्याचे आवाहन**

जालना/प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी पुन्हा मराठा आरक्षणासाठी सरकारविरोधात दंड थोपटलेत. त्यांनी येथे पत्रकारांशी बोलताना येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईत उपोषण करण्याची घोषणा केली. २९ ऑगस्ट रोजी मी मुंबईत उपोषणाला बसेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी तोपर्यंत आपली शेतीची कामे उरकून घ्यावीत. ते तिथे मला फक्त नेऊन सोडण्यासाठी आले तरी पुरेसे आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे म्हणाले की, मागील दोन वर्षांपासून आम्ही फार संयमाने घेत आहोत. सरकारने मागील उपोषण सोडताना आमच्या ४ मागण्यांची तत्काळ अंमलबजावणी करण्याची ग्वाही दिली होती. पण आज ३ महिने झाले. अद्याप एकाही मागणीची अंमलबजावणी झाली नाही. मला माझ्या समाजाच्या लेकरांच्या अडचणी पहाव्या लागतात. त्यामुळे आम्ही संयम तरी किती दिवस पाळायचा. त्यामुळे आम्ही २९ ऑगस्ट २०२५ रोजी आम्ही मुंबईत जाण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत गेल्याशिवाय यावर तोडगा निघणार नाही हे आता आमच्या लक्षात आले आहे.



# जात निहाय जनगणनेची घोषणा, छगन भुजबळांचा आनंद पोटात माईना

## मोदींचे आभार मानत म्हणाले...

प्रतिनिधी । मुंबई

मुंबई : गेली अनेक वर्षे सत्ताधारी पक्षातले काही गट आणि विरोधकांनी लावून धरलेली 'जातनिहाय' जनगणनेची मागणी लक्षात घेऊन बरोबर बिहार निवडणुकीच्या काही महिने आधी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.


स्वतंत्र भारतातील पहिली जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय मंगळवारी संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. केंद्र सरकारच्या निर्णयाचा प्रामुख्याने ओबीसी समाजाला शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्याही मोठा फायदा होईल, असे सांगितले जाते. पंतप्रधान मोदी यांच्या मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाचे ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी स्वागत केले.

जातनिहाय जनगणनेवर छगन भुजबळ म्हणाले...

गेल्या ३० वर्षांपासून आम्ही लढा देत होतो. दिल्लीचे रामलीला मैदान असेल किंवा पटण्याचे गांधी मैदान असेल अशा सगळीकडे आम्ही प्रश्न मांडला. आम्ही सर्वोच्च न्यायालयातही गेलो होतो. सर्वोच्च न्यायालयानेही सरकारला याविषयी तुमचे म्हणणे काय असे विचारले होते. त्याचवेळी खासदार म्हणून समीर भुजबळ यांनी लोकसभेमध्ये ठराव मांडला होता, त्याला गोपीनाथ मुंडे यांनी पाठिंबा दिला. यादव वगैरे मंडळींनीही त्याला पाठिंबा दिला. कॉंग्रेसचे प्रणब मुखर्जी यांनी सभागृहात सांगितले की जातगणना करतो, असे करतो असे सांगितले. त्यामुळे आम्ही सर्वोच्च न्यायालयातून केलेली याचिकाही मागे घेतली. पण ती जनगणना आयुक्ताकडून न होता ती वेगळ्या पद्धतीने झाली. त्यामुळे ती व्यवस्थित झाली नाही. त्याचे निकाल हाती आले नाहीत, त्यावेळी आमची फसवणूक झाली.



## पहलगाम हल्ला: भारताचा पाकिस्तानला कडक इशारा!



प्रतिनिधी । नवी दिल्ली

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव सतत वाढत आहे. मंगळवारी दोन्ही देशांच्या डीजीएमओंनी हॉटलाइनवर चर्चा केली आणि जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर (एलओसी) पाकिस्तानकडून विनाकारण गोळीबार सुरू असताना, भारताने पाकिस्तानला इशारा दिला आणि गोळीबार त्वरित थांबवण्यास सांगितले.भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांनी हॉटलाइनवर चर्चा केली, असे या प्रकरणाची माहिती असलेल्यांनी बुधवारी सांगितले.यावरून असे दिसून येते की चर्चेदरम्यान, पाकिस्तानी बाजूला भारतीय बाजूने केलेल्या विनाकारण गोळीबाराबद्दल सावध करण्यात आले होते. वर उल्लेख केलेल्या लोकांनी सांगितले की, दोन्ही लष्करी कारवायांच्या महासंचालकांमध्ये मंगळवारी चर्चा झाली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरून भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा झाली.

# नाशिकच्या रामकुंडावरून पाय घसरला बीडचा तरुण गोदापात्रात वाहून गेला, नदीत पाण्याचा विसर्ग सुरु




नाशिक / प्रतिनिधी

नाशिकच्या पवित्र रामकुंडावर गेलेल्या एका तरुणाचा पाय घसरल्याने तो क्षणार्धात गोदावरीत वाहून गेल्याची घटना समोर आलीय.बीड जिल्ह्यातील हा तरुण पाय घसरून थेट गोदावरी नदीत पडला आणि क्षणातच नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून गेलाय. गोदावरी नदीच्या पात्रात सध्या तब्बल १ हजार क्युसेक वेगाने विसर्ग सुरू आहे. हा तरुण गोदावरीत पडल्याने वाहून गेला असून, अद्याप त्याचा थांगपत्ता लागलेला नाही.

गोदावरी पात्रात सध्या मोठ्या प्रमाणात पानवेलींचे जाळं तयार झालं असून, त्या पानवेलीत हा तरुण अडकलेला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.जेसीबीच्या च्या सहाय्याने नदीतून पानवेली हटवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. प्रशासनाकडून शोधमोहीम सुरु करण्यात आली असून, प्रवाहातील प्रत्येक संभाव्य भागाची तपासणी केली जात आहे. श्राद्धपक्षामुळे रामकुंड परिसरात मोठी वर्दळ असतानाच ही दुर्घटना घडल्याने परिसरात भीतीचं आणि चिंतेचं वातावरण आहे.

नक्की घडलं काय?

नाशिकच्या पवित्र रामकुंडावर गेलेल्या तरुणाचा पाय घसरून तो गोदावरी नदीत वाहून गेला. गोदावरी पात्रात सध्या १ हजार क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे प्रवाह तीव्र असल्याने तरुण क्षणार्धात वाहून गेला. ही घटना घडल्यानंतर प्रशासन व स्थानिक आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री उशिरापर्यंत शोध मोहिम राबवण्यात आली मात्र अंधार आणि प्रवाहामुळे अडचणी आल्या आणि तरुणाचा काहीही थांगपत्ता लागला नाही. त्यामुळे मंगळवारी सकाळपासून पुन्हा एकदा शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. गोदावरी नदीच्या पात्रात सध्या मोठ्या प्रमाणावर पानवेली वाहून आल्या आहेत. त्या पानवेलीत हा तरुण अडकला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर पानवेली हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी जेसीबी यंत्राचा वापर करण्यात येत असून, आपत्ती व्यवस्थापन पथक व पोलीस दल घटनास्थळी कार्यरत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे रामकुंड परिसरात भीतीचं वातावरण आहे. श्राद्धपक्ष असल्याने गोदावरी घाटावर मोठी वर्दळ आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणांकडून नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नदी पात्रात उतरणे टाळावे, पाण्याच्या प्रवाहात जाऊ नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# प्रधानमंत्री आवास योजनेच्या सेल्फ सर्व्हेसाठी मुदतवाढ

प्रतिनिधी । बीड

**पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिताऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्याचा अंतिम दिनांक ३० एप्रिल २०२५ होता. त्याला आता १५ दिवसांची मुदतवाढ मिळाली असून १५ मे २०२५ पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे**

अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत १५ मे पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वत: सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ मिळालेली आहे. १५ मे ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी



करुन घ्यावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

### अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

### अडचण असल्यास संपर्क साधावा

घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास किंवा आर्थिक मागणी होत असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.





















# कार्यकर्त्यांच्या विजयासाठी दोन पाऊले पुढे राहील - आ. विजयसिंह पंडित

## महाराष्ट्र गौरव यात्रेचे गेवराईत जल्लोषात स्वागत

गेवराई / प्रतिनिधी (दै.महाभारत)


माझी निवडणुक झाली, आता कार्यकर्त्यांच्या निवडणुकीची वेळ आहे, कार्यकर्त्यांच्या विजयासाठी दोन पाऊले पुढे राहून काम करेल असा विश्वास आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र गौरव यात्रेच्या स्वागत प्रसंगी ते बोलत होते. यावेळी गोदावरी आणि सिंदफणा नदीचे पाणी संकलित करून त्याचे मंगल कलशात विधीवत पूजन करण्यात आले. महाराष्ट्र गौरव यात्रेचा उद्देश यानिमित्ताने समन्वयक आ. विक्रम काळे आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी विषद केला. महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आयोजित केलेल्या महाराष्ट्र गौरव यात्रेचे गेवराई शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले.



महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर महाराष्ट्र गौरव यात्रेचे आयोजन केले आहे. मराठवाडा विभागातील रथयात्रेचे बुधवार, दि.३० एप्रिल रोजी दुपारी गेवराई शहरात भव्य स्वागत करण्यात आले. ढोलताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतिषबाजीने आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उल्हासात यात्रेचे गेवराई शहरात स्वागत झाले. याप्रसंगी महाराष्ट्र गौरव यात्रेचे समन्वयक आ. विक्रम काळे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, रमेश आडसकर, सेवादलाचे कार्याध्यक्ष शिवाजीराव बनकर, दत्ता भांगे, अंकितताई विधाते, शिल्पाताई भोसले, बळीराम गवते, शेख निजामभाई आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. गेवराई तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने मान्यवरांचे भव्य स्वागत करण्यात आले.

गेवराई शहरातील माती आणि गोदावरी व सिंदफणा नदीचे पवित्र जल संकलित करून त्यांचे विधीवत पूजन यानिमित्ताने करण्यात आले. महाराष्ट्र गौरव यात्रेच्या आयोजना बाबतची भुमिका मराठवाडा यात्रा समन्वयक आ. विक्रम काळे यांनी यावेळी मांडली. राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी महाराष्ट्र गौरव रथयात्रेच्या आयोजनाचे महत्व आपल्या भाषणात विषद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांनी केले. आ. विजयसिंह पंडित यांनी आपल्या भाषणात पक्ष संघटना मजबुत करून येणाऱ्या निवडणुकीत विजयासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

यावेळी ओबीसी सेलचे प्रदेश संघटक भारत काकडे, राष्ट्रवादी विद्यार्थी सेलचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण यांच्यासह गेवराई विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# परळी वै. दिवाणी व फौजदारी नूतन इमारत

## न्या. नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते आज होणार कोनशिला समारंभ

बीड / दै.महाभारत

परळी वैद्यनाथ येथे बांधण्यात येणा-या दिवाणी आणि फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ उद्या गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी, महाराष्ट दिनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र मधुसूदन जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश आनंद लक्ष्मीकांत यावलकर हे असतील.या कोनशिला समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन परळी वकील संघाचे अध्यक्ष ड हरिभाऊ गुटटे आणि दिवाणी न्यायधिश (क स्तर) तथा न्यायदंडाधिकारी दीपक बोर्डे यांनी केले आहे.





केज ।सुमित मोरे
( दै, महाभारत )

केज शहरातील पंचायत समितीच्या मैदानावर चालक वाहक वाहन संघटनेच्या वतीने पहलगाम येथे अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरीकांना श्रद्धांजली वाहण्यात आली तसेच पाकिस्तानचा झेंडा जाळला व पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत तिव्र शब्दात निषेध व्यक्त केला.यावेळी चालक मालक वाहन संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आनंदग्राम आश्रमामध्ये सामाजिक कार्यकर्ते मा श्री माऊली पिंगळे यांनी

## दीड क्विंटल धान्य व ५०००/ रुपये देऊन आपल्या मुलीचा केला वाढदिवस संपन्न

तलवाडा / आर आर बहिर
(दै.महाभारत)

गेवराई तालुक्यातील उमापूर येथे सामाजिक कार्यामध्ये सातत्याने अग्रेसर असणारे माऊली पिंगळे यांच्या छोट्या मुलीचा म्हणजेच शिवानी दीदीचा दिनांक २९ एप्रिल रोजी वाढदिवस होता. खरंतर उन्हातान्हा मध्ये माऊली पिंगळे यांचे संपूर्ण कुटुंब सातत्याने घाम गाळून आपल्या कुटुंबाची उपजीविका ते भागवतात.

घाम गाळत असतानाही आपण सामाजिक बांधिलकी स्वीकारली पाहिजे, आजही समाजामध्ये उपेक्षित ,अनाथ ,निराधार, बेघर असणारी शेकडो ,हजारो मुले आहेत. अशा बिकट परिस्थितीमध्ये देखील या मुलांना स्वतःच्याही मुलांच्या पलीकडे जपणारे या समाज व्यवस्थेमध्ये आदरणीय दत्तामामा बारगजे ,संध्याताई बारगजे यांच्यासारखे दांपत्ये आजही या



कलियुगामध्ये कार्यरत आहेत हेच आपल्या या छोट्याशा मुलांना माहिती व्हावे म्हणून माऊली पिंगळे यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासहित शिवानी दीदीचा वाढदिवस पालीजवळ असणाऱ्या इनफंट इंडिया आनंदग्राम या ठिकाणी मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला.यावेळी आदरणीय दत्तामामा बारगजे, संध्याताई बारगजे,डॉक्टर पृथ्वीराज बारगजे ,उमापूर येथील पंढरी काका वैद्य, समाजसेवक सुभाष काळे सर, बावचकर,, इन्फंट इंडिया चा संपूर्ण परिवारासह माऊली पिंगळे यांचे कुटुंब व दैनिक महाभारत पत्रकार आर आर आबा तलवाडा यांनी दूरध्वनीवरून माऊली पिंपळे यांच्या मुलीला वाढदिवसाच्या शुभेच्छा इतर मान्यवर उपस्थित होते.

## गटशिक्षण अधिकाऱ्यांविरुद्ध खोट्या तक्रारीचा आरोप; ट्रेनी शिक्षकाची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

गेवराई येथील गटशिक्षण अधिकारी. शिंदे डी. आर. यांच्यावर कर्तव्यात कसूर, शासकीय यंत्रणेचा गैरवापर आणि खोट्या तक्रारीद्वारे मानसिक छळ केल्याचा गंभीर आरोप ट्रेनी शिक्षक सय्यद अलीम यांनी केला आहे. याबाबत त्यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार अर्ज सादर केला आहे. सय्यद अलीम हे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ट्रेनी शिक्षक म्हणून जि.प.प्रा.शाळा, ताकडगाव केंद्र, मन्यारवाडी येथे कार्यरत असून, ट्रेनी शिक्षक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष आहेत.



गटशिक्षण अधिकाऱ्यांनी ट्रेनी शिक्षकांच्या पाच महिन्यांच्या मुदतवाढीच्या पत्राबाबत कोणतीही कारवाई केली नाही. २३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा स्तरावर याबाबत पत्र निर्गमित झाले असताना, गेवराई तालुक्यातील मुख्याध्यापकांना याची माहिती देण्यात आली नाही, ज्यामुळे ट्रेनी शिक्षकांना नियुक्ती पत्र मिळाले नाहीत. सय्यद अलीम यांनी २८ एप्रिल रोजी सायंकाळी ६.५८ वाजता गटशिक्षण अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी जबाबदारी टाळून रोजगार कार्यालयाला भेटण्यास सांगितले. यावर प्रश्न उपस्थित केल्याने गटशिक्षण अधिकाऱ्यांनी सय्यद यांच्यावर धमकी आणि शासकीय कामात अडथळा असा खोटा आरोप करत तक्रार दाखल केली.सय्यद अलीम यांनी ही तक्रार निराधार असल्याचे सांगत, गटशिक्षण अधिकाऱ्यांनी शासकीय यंत्रणेचा गैरवापर करून त्यांचा मानसिक छळ केल्याचा दावा केला आहे. त्यांनी गटशिक्षण अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई, सखोल चौकशी, खोटी तक्रार रद्द करणे, ट्रेनी शिक्षकांचे नियुक्ती पत्र तातडीने निर्गमित करणे आणि फौजदारी कारवाईची मागणी जिल्हाधिकारी यांच्या कडे केली आहे. तक्रारीसोबत २८ एप्रिलचे पत्र, २३ एप्रिलचे शासकीय पत्र, दूरध्वनी संभाषणाची रेकॉर्डिंग आणि संबंधित कागदपत्रे जोडली आहेत.या प्रकरणाने गेवराई तालुक्यातील शैक्षणिक व्यवस्थापन आणि प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबत काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## अन्याया विरोधात लढण्याची प्रेरणा देणारे परशुराम – धनंजय कुलकर्णी

केज ।सुमित मोरे
(दै, महाभारत )

भगवान परशुराम जयंती निमित्ताने येथे गजानन औसेकर यांच्या हॉल वर जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमित्त भगवान परशुराम प्रतिमा पूजन आरती व प्रसाद सर्वांना देऊन साजरी केली. यावेळी अन्याया विरोधात लढण्याची प्रेरणा देणारे परशुराम आहेत अहंकाराचा नाश करणारे आणि उन्मत्त सत्ताधारायचा अंत करून सामान्य लोकांच्या शांततेने जिवन जगण्यासाठी सुकर करण्याची क्षमता निर्माण करणारी देवता आहे तसेच पित्याची आज्ञा पाळणारा आणि शास्त्र आणि शस्त्र याचा ज्ञाता म्हणून भगवान परशुराम हे सात चिरंजीवी पैकी एक आहेत असे धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी परशुराम जयंती उत्साहात साजरी केज येथे गजानन औसेकर यांच्या निवासस्थानी समर्थ नगर सहावी गल्लीकेज येथे परशुराम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली तरी सर्व उपस्थित मान्यवराचे चतुर्वेद प्रतिष्ठान तर्फे हार्दिक हार्दिक स्वागत आयोजक चतुर्वेद प्रतिष्ठाण, ब्राह्मण संघर्ष समिती केज धनंजय कुलकर्णी श्रीनिवास केजकर – अध्यक्ष श्रीराम शेटे – उपाध्यक्ष श्रीधर खोटं – सचिव शिवराज मुथळे – कोषध्यक्ष प्रदीप कुलकर्णी – सह सचिव चंद्रकांत पाटील – संघटक राहुल औसेकर – सदस्य गजानन औसेकर व्यकटेश महाजन – सदस्य अनंत कोकीळ –पुरोहित सदस् आदित्य विडेकर, रवींद्र औसेकर, गजू शेटे, नाना शेट अविनाश काळे, संदीप भुतडा, प्रकाश महाजन, विकास पोपळे, प्रवीण औसेकर, कुलकर्णी देवा, निवृत्त पी एस आय जोशी काका, सोमेशवर कुलकर्णी बाळू काका उमरीकर सह सर्व ब्राह्मण समाज बांधव केज तालुका एकत्र येऊन परशुराम जयंती साजरी करण्यात आली.



## महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात लोकशाहीचा पाया रचला : अश्विन मोगरकर

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

जगतज्योति महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात लोकशाहीचा पाया रचला असल्याचे प्रतिपादन अश्विन मोगरकर यांनी महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात केले. जगतज्योति महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन गणेशपार येथील सावळाराम मंदिरात करण्यात आले होते. यावेळी बोलताना अश्विन मोगरकर यांनी महात्मा बसवेश्वरांच्या महान कार्यास उजाळा दिला. बाराव्या शतकात राजेशाहीच्या कालखंडात लोकशाही पद्धतीने कारभार चालवणारे महात्मा बसवेश्वर यांनी जगभरातील लोकशाहीचा पाया रचला होता. जयंती उत्सवाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. प्रवीण फुटके यांनी सांगितले की, जगतज्योति महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंटप नावाचे एक व्यासपीठ तयार केले, जिथे वेगवेगळ्या जाती–धर्माचे लोक, महिला प्रतिनिधी एकत्र येऊन चर्चा करू शकत होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन स्वामी व आभार प्रदर्शन विजय जोशी यांनी केले. यावेळी तरुण भारत चे पत्रकार श्रीराम लांडगे, जेष्ठ नागरिक प्रभाकरराव देशमुख, भगवानअप्पा हालगे, सुरेश संघई, गणेश सावजी, गजाननअप्पा चौंडे, पद्माकर शहाणे, दिपक कुसुमकर, विरकुमार स्वामी, बाळकृष्ण फुले, सत्यनारायण मानधने, गणेश कोडी, गणेश दहातोंडे, गणेश नाईकवाडे, रमेश पवार उपस्थित होते.

## परळीत सद्भावना संकल्प सत्याग्रह आंदोलन १ मे ऐवजी आता ३ मे ला होणार

### माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी प्रसिद्धी माध्यमाला दिली माहिती

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक १ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित करण्यात आला होता.परंतु राज्य कमिटीचा दिल्ली येथे महत्वाची बैठक आयोजित केली असल्याने परळीत १मे ऐवजी आता ३ मे रोजी होणार असल्याची माहिती माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी



प्रसिद्धी माध्यमाना दिली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या सत्याग्रहात काँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे व माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केले आहे.

माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी माध्यमाना सांगितले कि,सद्भावना संकल्प सत्याग्रहाच्या जोरदार तयारी करण्यात आली आहे. काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. याआधी मस्साजोग ते बीड व नागपूर शहरात सद्भावना यात्रा काढण्यात आली, जनतेने या यात्रांना प्रचंड प्रतिसाद दिला. गेल्या काही दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केले आहे.

## अँड.मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने संत बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

### संत बसवेश्वरांनी समतेचा आणि सामाजिक न्यायाचा संदेश दिला– अँड.मनोज संकाये

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

संत महात्मा बसवेश्वर यांची जयंती आज राज्यभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. कीर्तन, प्रवचन, मिरवणूक, सामाजिक उपक्रम यांद्वारे त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. संत बसवेश्वरांनी समतेचा आणि न्यायाचा संदेश दिला असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केले.

बसवेश्वर हे १२व्या शतकातील थोर संत, समाजसुधारक आणि लिंगायत धर्माचे प्रवर्तक मानले जातात. त्यांनी कर्मप्रधानता, समता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि स्त्री–पुरुष



समानतेचा जोरदार पुरस्कार केला. त्यांच्या वचनोंद्वारे त्यांनी समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला

या निमित्ताने त्यांनी परळी येथील विद्यानगर गार्डन परिसरातील संत महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच शुभेच्छा दिल्या व बसवेश्वरांच्या विचारांची आज गरज असल्याचे अधोरेखित केले.संत बसवेश्वरांचा समाजसुधारणेतील वारसा आजही प्रेरणादायी असून, त्यांच्या विचारांचा अवलंब करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल

यावेळी अनिल चौधरी, सोमनाथ नाईकवाडे, शिरीष सलगरे, मुंजा साठे, रवी गुळभिले काशिनाथ सरवदे, शिवा बडे,कैलास रिकीबे, संदीप चौधरी,प्रवीण रोडे, सुंदर आव्हाड,अनंत कातकडे,देविदास मुंडे,अमोल वाघमारे,राम गडदे, अक्षय ढगे आदींसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.


## क्रेडाईच्या उपाध्यक्ष पदी युवा उद्योजक अमोल माळवे यांची निवड

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभार)

बांधकाम व्यावसायिकांची देशपातळीवरील सर्वात प्रभावी संघटना असलेल्या कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या (क्रेडाई) बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी गेवराई जि.बीड येथील युवा उद्योजक अमोल माळवे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. निवड झाल्याबद्दल अमोल माळवे यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत असून , त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत. सदरील निवडीचा कालावधी दोन वर्षांचा आहे. दरम्यान, संघटनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील उद्योजक, व्यापाऱ्यांच्या हिताचे निर्णय घेऊन, सर्वसमावेशक काम करण्यासाठी आपले प्राधान्य असेल, माझी निवड करून ; माझ्यावर विश्वास व्यक्त केल्या बद्दल संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया (क्रेडाई) ही भारतातील रिअल इस्टेट विकासकांची (बिल्डर्स) सर्वोच्च संस्था आहे. सदरील संघटना रिअल इस्टेट उद्योगाच्या विकासासाठी आणि सदस्यांच्या हितासाठी काम करते. संघटीत रिअल इस्टेटला प्रोत्साहन देणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे, या उद्दिष्टाने संघटना स्थापन झाली आहे. संघटनेच्या बाबतीत धोरनात्मक निर्णय घेणे, रिअल इस्टेट क्षेत्रातील नैतिक पद्धती सुनिश्चित करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

क्रेडाईची बीड जिल्हा कार्यकारिणी २०२५ – २०२७ वर्षाकरीता निवडण्यात आली असून बीड जिल्हाध्यक्ष पदी सुरेंद्र कासट तर सचिवपदी इंजि. संतोष सानप, सह–सचिव इंजि. अमित वणवे, खजीनदार सुधीर अडाने, अध्यक्ष इलेक्ट इंजि. अक्षय घोडके, उपाध्यक्षपदी संजय आंबेगावे, उपाध्यक्ष शामीर सय्यद, उपाध्यक्ष इम्रान नाईक, संयोजक यूथ विग इंजि. प्रमोद घोडके, सह संयोजक यूथ विंग गौरव दुग्गड, समन्वयक वूमेनस विंग अन्विता काटकर, सह–समन्वयक वूमेनस



विंग शीतल घोडके, संयोजक प्रशासकीय समिती निहाल शेख , कलीम जहांगीर यांची निवड करण्यात आली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा, हॉटेल नीलकमल येथे उत्साहात पार पडला आहे. दरम्यान, युवा उद्योजक अमोल माळवे यांची उपाध्यक्ष पदी निवड जाहीर होताच, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# १ मे - संघर्ष , सन्मान आणि अस्मितेचा दिवस

सकाळी ऑफिसला जाणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर जरा वेगळाच उत्साह असतो . सरकारी इमारतींवर ध्वज फडकत असतो. शाळांमध्ये विशेष कार्यक्रमांची तयारी चाललेली असते . आणि अनेक ठिकाणी रस्त्यांवरून एखादी उत्साही रॅली जाताना दिसते . हाच तो दिवस - १ मे .परंतू हे सगळं केवळ एक दिवस म्हणून पाहिलं , तर त्यामागचा इतिहास, संघर्ष, आणि गौरव आपल्याला उमगणार नाही. या एका तारखेत दोन लढ्यांची , दोन वेगवेगळ्या पण समांतर वाटचालींची आठवण दडलेली आहे - कामगारांच्या हक्कांची आणि मराठी अस्मितेच्या स्वाभिमानाची .

कामगारांची जागतिक चळवळ - श्रमाचा सन्मान

१८८६ , अमेरिकेतील शिकागो . धूळ उडवत चाललेले हजारो पाय . मागणी होती - आठ तासांचा कामाचा दिवस .कारखान्यांमध्ये दिवसाचे १२-१६ तास राबवले जात होते. कामाच्या ठिकाणी सुरक्षा नव्हती , सुट्ट्या नव्हत्या , आणि आरोग्य व्यवस्थेची तर कोणी कल्पनाही केली नव्हती .

शिकागोतील हे आंदोलन चिरडायला पोलिसांनी गोळीबार केला , अनेकजण शहीद झाले . पण त्याचवेळी , श्रमाला आवाज मिळाला . त्याच लढ्यातून जन्म झाला - 'मजूर दिना'चा , ज्याला आपण मराठीत ' कामगार दिन ' म्हणतो . ही लढाई केवळ अमेरिकेपुरती मर्यादित राहिली नाही . जगभर पसरली . भारतात १९२३ साली चेन्नईत ( तेव्हाचं मद्रास ) पहिल्यांदा १ मे ' कामगार दिन ' म्हणून साजरा करण्यात आला . ही चळवळ देशभर कामगार संघटनांमध्ये पसरत गेली .आज अनेक ठिकाणी कामाचे ठरलेले तास , सुट्ट्या , सुरक्षा व्यवस्था दिसतात - पण ते काही आपसूक आलेले नाहीत . या सगळ्या मागे एका दीर्घ लढ्याची , संघटनेची , त्यागाची आणि बलिदानाची कथा आहे .आधुनिक काळात ' कामगार ' ही संकल्पना बदलली आहे . फक्त कारखान्यातला कामगार नव्हे - तर रिक्षाचालक , बांधकाम मजूर , महिला बचत गटांतील महिला , डिलिव्हरी बॉय , तंत्रज्ञान क्षेत्रातील फ्रिलान्सर्स , खढ मधील काम करणारे , शेतीतले कामगार - हे सारेच आजच्या अर्थव्यवस्थेचे शिल्पकार आहेत .पण अजूनही अनेक क्षेत्रांमध्ये कामाच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न आहेत . कधी कधी आपल्या नजरेस पडतही नाही , पण आपल्याला मिळणाऱ्या अनेक सेवांमागे अदृश्य श्रमाचा मोठा हात असतो . ' कामगार दिन ' म्हणजे या श्रमांची आठवण ठेवण्याचा दिवस आहे - केवळ एक दिवस साजरा करण्यासाठी नव्हे , तर रोजच्या आयुष्यात त्यांचं योगदान समजून घेण्यासाठी .

महाराष्ट्र दिन - अस्मितेचा संघर्ष आणि गौरव :' महाराष्ट्र ' हे नाव आज आपण किती सहज उच्चारतो . पण त्या नावामागेही एक लढा आहे . एक प्रखर आंदोलन आहे . आणि शेकडो हुतात्म्यांचं बलिदान आहे . १९५० च्या दशकात , राज्य पुनर्रचनेचा मुद्दा देशात गाजत होता श्र. भाषिक आधारावर राज्यं बनवायचं ठरलं . मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य हवं , ही मागणी तितक्याच तीव्रतेने पुढे आली . संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली . गावोगावी सभा झाल्या , मोर्चे निघाले .

या आंदोलनाचा केंद्रबिंदू होता - मुंबई . गुजराती भाषिकांसाठी स्वतंत्र गुजरात , आणि मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र हवा - ही मागणी आता पेट घेत होती . २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईतील फ्लोरा फाउंटनवर पोलिस गोळीबार झाला . १०६ हुतात्म्यांनी आपलं प्राणार्पण केलं . त्यांच्या स्मरणार्थ , आज त्याठिकाणी उभा आहे - ' हुतात्मा चौक '. हे बलिदान व्यर्थ गेलं नाही . अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची अधिकृत स्थापना झाली . त्याच दिवसापासून आपण ' महाराष्ट्र दिन ' साजरा करतो . शासकीय इमारतींवर ध्वज फडकतो , परेड होते , शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम होतात , आणि हुतात्म्यांना अभिवादन केलं जातं . पण या सर्व गोष्टींपलीकडे , हा दिवस आपल्याला सतत आठवण करून देतो - आपली भाषा , आपली संस्कृती , आपली ओळख - ही फक्त परंपरेत टिकत नाही , तर ती लढून मिळवावी लागते . या दोन घटनांचं एकत्र येणं म्हणजे एक विलक्षण योगायोगच नव्हे - तर समांतर लढ्यांची एकसंध जाणीव आहे .कामगारांनी कामासाठी लढा दिला . मराठी जनतेने अस्मितेसाठी लढा दिला . दोघांचाही आधार एकच - सामूहिक संघर्ष . आजही आपल्यासमोर नवे प्रश्न आहेत - ग्रामीण भागाचा विकास , श्रमिकांचे कल्याण , आणि भाषिक अस्मिता . १ मे आपण साजरा करतो तो याच जागरासाठी - संघर्ष आठवण्यासाठी , आणि नव्या पिढीसमोर त्याची प्रेरणा ठेवण्यासाठी . महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या अनेक शुभेच्छा

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

# आमदार प्रकाश सोळंके यांचे खंदे समर्थक माजी उपसभापती सुशिल सोळंके चा उच्च न्यायालयाने जामिन फेटाळला

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळुंके यांचे खंदे समर्थक माजलगाव पंचायत समितीचे उपसभापती सुशील सोळुंके यांच्यासह त्यांच्या समर्थकावर अशोक सोळुंके यांच्या दुकानात जाऊन हल्ला केल्याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी औरंगाबाद हायकोर्ट मध्ये धाव घेतली होती मागिल दोन महिन्या पुर्वी २महिन्याचा आंतरीम जामीन दिला होता.या आंतरिम जामिनाची मुदत संपल्यानंतर कारण जामिनीसाठी सुशिल सोळंके यांनी मा.उच्च न्यायालयात धाव घेतली असता फिर्यादिचे वकील एडवोकेट सुदर्शन सोळंके यांनी जोरदार युक्तिवाद केल्याने मा. उच्च न्यायालयाने सुशील सोळंके यांचा जामीन अटकपूर्व जामीन फेटाळुन लावल्याने त्यांना मोठी चपराक बसलेली आहे.



प्रथमदर्शनी गुन्हयातील सहभाग, गुन्हेगारी पार्श्वभुमी या कारणास्तव माजलगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशिल विजयकुमार साळुंके याचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे मा. न्यायमुर्ती श्री अरुण पेडणेकर यांनी फेटाळला आहे. पोलीस ठाणे माजलगाव शहर जिल्हा बीड येथे फिर्यादी अशोक बाळासाहेब सोळंके याने सुशिल साळुंके व इतर ६ आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली होती. फिर्यादीने फिर्यादीत म्हटले होते की, आरोपी सुशिल साळुंके याची आई ग्रामपंचायत सरपंच आहे. फिर्यादी व त्याच्या भावाने ग्रामपंचायत निवडणुकीत आरोपीच्या आई विरोधात प्रचार केला होता. फिर्यादीने ग्रामपंचायत कारभाराविरुध्द उपोषण केले होते. तू आमच्या विरोधात उपोषण का करतोस या कारणास्तव आरोपीतांनी फिर्यादीच्या दुकानात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन त्याला मारहाण केली व दुकानातील वस्तुंची मोडतोड करुन नुकसान केले. तसेच आरोपी सुशिल साळुंकेने फिर्यादीचा मोबाईल घेऊन गेला. या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल झाला होता. सुशिल साळुंके याचा अटकपूर्व जामीन अर्ज माननीय सत्र न्यायालय माजलगाव यांनी फेटाळला होता. अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी आरोपींनी माननीय उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता.

मा. उच्च न्यायालयाने न्याय निवाडयात म्हटले आहे की, सीसीटीव्ही मध्ये सुशिल साळुंके याचा गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग दिसून येतो. यापुर्वी सुध्दा सदर आरोपीविरुध्द गुन्हे दाखल आहेत. प्रथमदर्शनी आरोपींनी गुन्हा केल्याचे दिसून येत आहे.

सुशिल सोळंके केव्हाही आटक होवु शकते. माजलगाव पं.स.चे माजी उपसभापती सुशिल सोळंके हे आ.प्रकाश सोळंके यांचे खंदे समर्थक आसल्याने त्यांच्या वरदहास्ताने त्यांना पोलिसांनी आटक केली नसल्याने ते माजलगाव राहुन त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी प्रयत्न केला . माजलगाव घ्या सत्र न्यायालयाने आटकपूर्व जामिन फेटाळला. त्यांनतर उच्च न्यायालयाने दोन महिन्यांचा आंतरिम जामिन दिल्यानंतर तो ही फेटाळल्याने सुशिल सोळंके यास कधी आटक व्हावे लागेल.पण पोलिसांच्या भुभिकेकडे माजलगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# लोकनेते सोळंके कारखान्याचा ऊस तोडणी ,वाहतुक कराराचा प्रारंभ

माजलगाव : अमर साळवे
( दै. महाभारत )

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा आगामी गाळप हंगामाचा ऊस तोडणी, वाहतुक कराराचा मान्यवरांच्या हस्ते अक्षयतृतीयाच्या शुभमुहूर्तावर प्रारंभ करण्यात आला. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना संस्थापक स्व.सुंदररावजी सोळंके साहेब यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना स्थापनेपासुन अविरत गाळप हंगाम करणारा मराठवाड्यातील नामांकित साखर कारखाना असुन,शेतकऱ्यांच्या ऊसला रास्त भाव देऊन, ऊसउत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासणारा कारखाना म्हणुन ओळखला जातो.या कारखान्याचा सन २०२५२६ ऊस गळीत हंगामासाठी ऊस तोडणी व वाहतुक करार प्रारंभ कारखान्याचे मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय तृतीयीयाच्या शुभमुहूर्तावर दि.३०ड़०४ड़२०२५ रोजी करण्यात आला.यावेळी कारखाना शेती कार्यालयात घेण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमाच्या प्रारंभी माता वैष्णवी देवीचे पुजन करून जेष्ठ संचालक भागवतराव देशमुख यांच्या हस्ते कराराचा प्रारंभ करण्यात



आला.यावेळी करार होणाऱ्या यंत्रणेस डव्हान्सचा पहिला हप्ता लवकरच देण्यात येणार आहे.याप्रसंगी ज्येष्ठ संचालक भागवतराव देशमुख म्हणाले की,पुढील हंगामात कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस गाळपास आणण्यासाठी स्थानिक यंत्रणा अधिकाअधिक सक्षमपणे उभारण्यात येईल

त्यासाठी कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस तोडणी,वाहतुक,कंत्राटदारांनी करार करावेत. असे आवाहन देशमुख यांनी केले.यावेळी ऊस तोडणी, वाहतुक कंत्राटदार यांच्यासह कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर ग्री मॅनेजर रविंद्र देशमुख, कारखाना सचिव सुरेश लगड, ऊस पुरवठा अधिकारी भोसले ऊस विकास अधिकारी स्वामीसह इतर उपस्थित होते.

# प्रशासन आपल्या दारी आल आहे : निराधार लाभार्थ्यांनो गावातच डीबीटी करून घ्या : नायब तहसीलदार प्रशांत जाधवर

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

सध्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाभरात संजय गांधी , श्रावणबाळ विभागामार्फत गावोगावी कॅम्पचे आयोजन करण्यात येत असून लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून देण्याची मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके हे वेळोवेळी नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वयोवृद्ध लाभार्थ्यांना तहसील कार्यालयास येण्याची गरज भासू नये यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे .

सोमवार २८ एप्रिल रोजी कुर्ला येथे अशाच एका कॅम्पचे आयोजन प्रशासनामार्फत करण्यात आले नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांच्या उपस्थितीत वयोवृद्ध महिला व लाभार्थी यांचे डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून घेण्यात आली यावेळी माहिती देताना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी नमूद केले की बीड तालुक्यात संजय गांधी योजनेचे म्हणजेच ज्यांचा वयोगट १८ ते ६५ वर्षे आहे , त्यांची लाभार्थी संख्या ८८६० इतकी आहे . या लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत प्रतिमाह १५०० रुपये इतके मानधन देण्यात येते . श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी हे ६५ वयापुढील असतात . अशा लाभार्थ्यांची संख्या ८८२४ इतकी आहे . ६५ वर्षावरील लोकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना सुद्धा असून त्या योजनेचे ३७३१ लाभार्थी आहेत . या योजनेत राज्य शासन १००० रुपये तर केंद्र शासन ५०० रुपये इतके मानधन लाभार्थ्यांना देत असते . डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे . त्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड हे मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य



आहे .

डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते .

या कॅम्पच्या वेळी कुर्ला गावच्या सरपंच मंडाबाई पांडुरंग मार्कड , उपसरपंच महादेव साहेबराव पटेकर , ग्रामपंचायत सदस्य शितल संदीप पाटील , औरंगपूरचे सरपंच गोरख महादेव चांगण , कुर्ला मंडळाचे मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ , ग्राम महसूल अधिकारी संजय नेवडे , उमेश खिंडरे , दुष्यंत शेळके , सुनील प्रधान , ग्राम महसूल सेवक कृष्णा राठोड , महसूल सेवक जवरे , संगणक ऑपरेटर महेंद्र राऊत व गावकरी परीक्षित पाटील , ज्ञानेश्वर यादव , ग्रामपंचायत शिपाई बाबासाहेब कानडे , महादेव आरसुळ नवनाथ गव्हाणे , परमेश्वर गुंड , शेख खाजाभाई , भगवानराव यादव , दिगंबर शेवाळे उपस्थित होते .

यावेळी बोलताना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी सांगितले की फार्मर आयडी सुद्धा शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक आहे . शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावा . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः तालुक्यात फार्मर आयडी काढून घ्यावा यासाठी भेटी देत आहेत . तरी शेतकऱ्यांना आवाहन राहील की त्यांनी ग्री स्टॅक प्रकल्पांतर्गत आपला फार्मर आयडी काढून घ्यावा . त्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी ग्रामसेवक अथवा गावचे कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले .

बीड तालुका प्रशासनाचा वयोवृद्ध व अडाणी लाभार्थ्यांप्रती असलेला हा कनवाळूपणा निश्चितच अभिनंदन आहे . ग्रामीण भागातील लाभार्थी , नागरिक हे खरोखरच प्रशासनाचे आभारी आहेत , अशा स्वरूपाची चर्चा यावेळी ऐकण्यास मिळाली . खचितच अशाप्रकारे प्रशासन नागरिकांसाठी दोन पावले पुढे आले तर प्रशासनाकडे नागरिक आपोआपच आदराने बघतील यात शंका नसावी .

# राळेसांगवी ग्रामस्थांची भगवानगडाला २ कोटी १५ लाख रुपयांची विक्रमी देणगी

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

भगवानगड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे राळेसांगवी (ता.शिरुर जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही २ कोटी १५ लाख रुपये झाली.



करी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला –खा रजनीताई पाटील

केज । सुमित मोरे
(दै, महाभारत )

सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. शाश्वत विकासासाठी असे प्रकल्प उभारले पाहिजेत असे मत खा.रजनीताई पाटील यांनी केले त्या उमरी शिवारातील गंगा माऊली शुगर अँड अलईमेंट अंतर्गत चा ३ मॅगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ मंगळवार रोजी झाला. यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.गंगा माऊली शुगरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे,माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील, काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, हनुमंत मोरे,बाबाराजे देशमुख,उमरीचे सरपंच अमोल मुळे,उप कार्यकारी अभियंता श्री सय्यद,महेश अंडील, आदित्य ग्रीन एनर्जीचे जेयश बजाज, स्टेट बँक ऑफ इंडिया चे मनदीप वर्मा, गंगा माऊली उद्योग समूहाचे प्रवीण मोरे,अविनाश मोरे, तेजस्विनी पाटील,देविका पाटील,रेवती सोनवणे, आदींची उपस्थिती होती उमरी गावकऱ्यांच्या वतीने शिवरात प्रकल्प उभा केल्यामुळे खा रजनीताई पाटील, लक्ष्मणराव मोरे



## उमरी शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना राहुल सोनवणे म्हणाले खा रजनीताई पाटील,लक्ष्मणराव मोरे यांनी या भागाचे नंदनवन केले. गंगा माऊली साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊसाला चांगला भाव मिळत आहे .उमरी भागातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसभर विद्युत पुरवठा होणार असल्याने त्यांच्या जीवनात समृद्धी येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गंगा माऊली शुगर इंडस्ट्रीज कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र...

कणखर देशा, दगडांच्या देशा, महाराष्ट्र देशा. गर्जा महाराष्ट्र माझा, जय जय महाराष्ट्र माझा या पेक्षा आणखी काय वर्णन करणार माझ्या महाराष्ट्राच. संताच्या वाणीने, वारकरी संप्रदायाने दलितांचे कैवारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या न्याय, समता बंधुताने, स्त्रीशिक्षणाची ज्योती लावणाऱ्या फुले दांपत्याने आणि शिवबाच्या कर्तुत्वाने पावण झालेली ही पतित पावन महाराष्ट्र भुमी. जेव्हा महाराष्ट्रा बद्दल विचार करते तेव्हा सगळ्यात पहिले आठवतात ते संयुक्त महाराष्ट्र चळवळी चे दिवस. होय भारत स्वातंत्र्या नंतरही महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य नव्हतं. मराठी भाषिकांचा महाराष्ट्र अनेक प्रांतात विभागलेला होता, विदर्भ हा प्रांत मध्य प्रदेशामध्ये तर मराठवाडा हैदराबादच्या निजामशाही मध्ये तर मुंबईसह पश्चिम महाराष्ट्र गुजरात प्रांतामध्ये विभागलेले होते. आणि बेळगाव हे कर्नाटक (म्हैसुर प्रांतामध्ये) जे अजुनही तिथेच आहे. या विभागलेल्या विभक्त महाराष्ट्राला संयुक्त करण्यासाठी छत्रपति शिवबाच्या लेकरानी कंबर कसली आणि लाखो गीरणी मजुर, कामगार आणि दलित वर्गानी एकत्र येवून हा लढा कुठल्याही राजकीय पक्षाच्या मदती शिवाय सुरु केला,

त्याचं नेतृत्व करायला कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे, सह अनेक ई. मंडळी सरसावली होती. १९५५-५६ पासुन सुरु झालेला हा रणसंग्राम तब्बल ५ वर्षे चालला आणि २१ नोव्हेंबर १९५९ रोजी १०५ हुतात्म्याच्या प्राणाची आहुती घेऊन थांबला. आणि कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांची मागणी मान्य होऊन संयुक्त महाराष्ट्राच स्वप्न १ में १९६० जागतिक कामगार दिनी सत्यात उतरलं,

तरी बेळगाव च स्वप्न मात्र भंगल, जरी आज बेळगाव महाराष्ट्रात नसेल तरीही महाराष्ट्र रुबाबात, मोठ्या दिमाघात उभा आहे. पण बेळगाव नसल्याची खंत अजुनही जाणवते. आज त्या १०५ हुतात्म्याच्या रक्त रंजित बलिदानाने पावन झालेला हा लढा थांबला जरी असला तरी संपला मुळीच नाही. आजही प्रत्येक महाराष्ट्रीय मराठी माणसाच्या मनात महाराष्ट्राच्या आणि मराठीच्या विकासाच एक स्वप्न नक्कीच आहे, एक आग त्याच्या हृदयात सतत धगधगत आहे. आज विचार करण्या सारखी गोष्ट अशी आहे की, महाराष्ट्र रुबाबात जरी उभा असला तरी तो खरच सुखात नांदतो आहे का? आज महाराष्ट्रास एकत्र करण्या साठी लढा देणार्या त्या गिरणी कामगारांच्या गिरण्याच्या जमीनीचे लचके तोडण्या साठी नेते, धनाढ्य आणि राज्यकर्त्यांन मध्ये संगनमत झालेले दिसते आहे. आज सगळ्यात मोठा प्रश्न महाराष्ट्रा समोर आहे तो भ्रष्टाचाराचा, बेरोजगारीचा, आणि महागाईचा तरी सुद्धा मनात विश्वास आहे तो महाराष्ट्राच्या प्रगतीचा. कारण काही काळा पूर्वी महाराष्ट्र देशातील सर्वात प्रगत राज्य होत. आपल्या मनातील दुर्दम्य आशावाद हाच महाराष्ट्राच्या प्रगतीचा पाया ठरू शकणार आहे.

प्रत्येक मराठी मनाप्रमाणे माझंही आशावादी मन ह्या महाराष्ट्र भूमी साठी काही स्वप्न रंगवातंय, माझ्या स्वप्नातला महाराष्ट्र जगाच्या पाठीवर कोहिनूर हिर्या प्रमाणे चमकत असेल, इथे छत्रपतींची शिवशाही नांदेल, १०५ हुतात्म्याच्या बलिदानाची प्रेरणा नांदेल, महाराष्ट्राची माय मराठी हिं ज्ञानभाषा असेल, इथे पुन्हा एकदा मजूर, दलित, कामगार आणि शेतकर्यांच राज्य नांदेल. शेतीसाहित अनेक लहान मोठ्या उद्योगांचा विकास होईल,पण तेही निसर्गाचा समतोल राखून. आणि जागतिकीकरणाचा अधिकाधिक फायदा हि महाराष्ट्राला होईल, इथला प्रत्येक तरुण सुशिक्षित असेल पण तो बेरोजगार नसेल, माझ्या या स्वप्नाच्या महाराष्ट्रात अनेक उद्योगासहित सहकार क्षेत्राचीही भरभराट हि जगात कुठेही झाली नाही एवढी असेल. इथल्या राजकीय पक्ष्यांच्या भुमिका ह्या सत्ताभिमुख नसुन त्या समाजाभिमुख असेल. त्या मुळे कुठल्या हि ठराविक प्रांतावर कुठल्या हि प्रकारचा अन्याय होणार नाही आणि कुठला हि प्रांत महाराष्ट्रा पासुन वेगळा होण्याचा विचारही करणार नाही. माझ्या या स्वप्नानी रंगलेल्या महाराष्ट्रात कलागुणांना अधिक वाव असेल, महाराष्ट्राच्या भर-भराटी साठी विचारवंतांच्या विचाराची जोड असेल, माझ्या स्वप्नातल्या महाराष्ट्रात अनेक बाबा आमटे, अण्णा हजारे, डॉ आंबेडकर, टिळक, सावरकर, जन्मास येतील.

प्रबळ विश्वासाच्या जोडीने बघितलेलं हे स्वप्न नक्कीच खरं होईल....आणि हा शिवाजी महाराजांचा दुर्दम्य आशावादी महाराष्ट्र पुन्हा एकदा यशाच्या शिकारावर उभा असेल....डांबराच्या रस्त्यावर मातीच्या पावलांचे ठसे आणि मातीच्या वाटेवर डांबराचे ओरखडे जो पर्यंत पडत राहतील अगदी तोपर्यंत आपला महाराष्ट्र आबादित राहील....आपल्याही मनात काही स्वप्न महाराष्ट्रासाठी नक्कीच असतील..

जय हिंद...... जय महाराष्ट्र.....

रूचिरा बेटकर,नांदेड.
९९७०७७४२११

# कातरणी च्या संत ज्ञानेश्वर विद्यालयात भरली २१ वर्षानंतर पुन्हा शाळा

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

कातरणी ता.येवला येथे संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे २००४,साली दहावीची परीक्षा दिल्यानंतर, २१ वर्ष उलटून गेल्यानंतरही कोणत्याच वर्ग मित्रांची -मैत्रिणींची भेटच होईना , मग दोन-तीन विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी, सोशल मीडियाचा फायदा घेत एक व्हाट्सअप चा ग्रुप बनवला ग्रुपला, शाळेतील सर्व जुने वर्गमित्र जोडण्याचा प्रयत्न केला, मग त्यांनी एकमेकांशी संवाद साधून, सर्वांनी एकत्र जमण्याचे २७एप्रिल ०२५ रोजी सकाळी दहा वाजता, आपण ज्या शाळेत शिकलो त्याच संत ज्ञानेश्वर विद्यालयात जमण्याचे ठरले, प्रत्येक विद्यार्थ्याने, आपापले शाळेतले नाव व विद्यार्थिनींनी माहेरचे नाव व लग्नानंतरचे बदललेले नाव सांगताना बराच हशा पिकत होता, शाळेत असताना छोटे छोटे चिमुकले, आज सर्वांचे चेहरे नजरेसमोर आले तेव्हा, असे वाटायचे सर्वांचे आयुष्य अर्धे होऊन गेले की काय असं भासत होतं, सर्व शिक्षक व विद्यार्थी जेव्हा एकत्र जमले, तेव्हा एकमेकांना आपुलकीने ओळख करून घेतांना विचारले, सुरुवातीला प्रत्येकाचे डोळे पाणवले होते, नंतर बराच हास्यकल्लोळ चालला, २१ वर्षापासून ची आस लागून होती एकमेकांच्या भेटीची, ती आज स्नेह संमेलनाच्या निमित्ताने पूर्ण झाली, सर्व शिक्षकांचे भाषण झाल्यानंतर



विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक केले व आशिर्वाद दिले,विद्यार्थ्यांच्या वतीने विद्यालयाला ५१००रु देणगी देऊन स्नेह मेळाव्याची एक आठवण ठेवली, तसेच दत्तू सोनवणे या विद्यार्थ्याने, आपल्या मुलीच्या व पुतणीच्या स्मृतीप्रित्यर्थ११०००रु शाळेच्या इमारतीसाठी दिले, उपस्थित मान्यवरांना शाल श्रीफळ देऊन, विठ्ठल रुक्मिणी ची मूर्ती भेट देण्यात आली, सर्व विद्यार्थ्यांच्या चहापानानंतर, सात पकवानाचे जेवण झाले, गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी, आठवणींचा साठा नेहमीच मी स्वतः जतन करेल, व पुन्हा स्नेह मेळाव्याला आम्ही उपस्थित राहु असे एकमत केले, यावेळी उपस्थित ,मुख्याध्यापक - एस टी पवार सर, शिक्षक वृंद- ठाकरे सर, पाटील सर, खुटे सर, आवारे सर, कांदळकर सर, येवले सर, बारे सर,जगताप सर,महाले सर, वैराळ मॅडम, संसारे मॅडम,पगारे सर, पाटील मॅडम, ठोंबरे मॅडम , संकल्पना -सामाजिक कार्यकर्ते विजय कुऱ्हाडे , सुत्रसंचलन धनराज दोंड, हभप श्रावण म.जगताप कार्यक्रमाचे आयोजक - प्रतिभा सोनवणे , सुवर्णा गुंजाळ,संदीप कदम, वाल्मीक कदम, गोरख संत, प्रवीण कदम, गोकुळ शिंदे, अनिल कदम, अतुल झाल्टे, गणेश ढोणे, सकाहरी ढोमसे, विजय गुंजाळ आणि विद्यार्थिनी -कुसुम ढोमसे, चित्रा नवले, सुरेखा कुऱ्हाडे,आशा कदम,सीमा गांगुर्डे, कल्पना सोनवणे, शोभा सोनवणे, ज्योती कदम, सविता सोनवणे, उषा कदम, संगीता कदम, मनीषा पगार, छाया पगार,विद्या पवार, साधना साठे, सुनिता पुरकर, शारदा कदम, रत्ना झाल्टे.इतर सर्व कातरणी, आडगाव, विखरणी, विसापूर, कातरवाडी, रापली, वडगाव , आदि गावातील १०० पेक्षा जास्त विद्यार्थी व स्नेहिमित्र उपस्थित होते.

# नंद्याळ येथील जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदिती तराळ प्रथम

कुडूत्री / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

नंद्याळ ता कागल येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये राधानगरी तालुक्यातील कसबा वाळवे येथील कन्या विद्या मंदिर ची विध्यार्थीनी आदिती तराळ हिने प्रथम क्रमांक पटकाविला.द्वितीय क्रमांक क्षितिजा चव्हाण (तीळवणी) व पारितोष पाटील (नांगनूर ) यांना विभागून तर संघर्ष कांबळे, (कोल्हापूर ),श्रेया शिंदे (कौलगे) व सृष्टी कांबळे नंद्याळ यांना विभागून तिसरा क्रमांक देण्यात आला.

सकाळी सर्व धम्मबांधव यांच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली .शोभा यात्रेत सर्व महिला पुरुष व लहान मुले हातामध्ये बाबासाहेबांच्या कार्याचे फलक घेऊन महापुरुषांच्या घोषणा देत मिरवणूक काढली शोभायात्रेत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. शोभायात्रेमधील बाबासाहेब यांची प्रतिमा असलेल्या रथाचे गावातील महिलांनी मोठ्या उत्साहात औक्षण करून अभिवादन केले.

त्यानंतर महापुरुषांच्या प्रतिमेची पूजन नंद्याळच्या लोकनियुक्त सरपंच सौ. मनीषा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्रिशरण व पंचशील ही घेण्यात आले.यावेळी



श्री.हिरामणी कांबळे सर यांनी माणूस म्हणून आम्हाला हक्क आणि अधिकार देणारे बाबासाहेब हे थोर समाज सुधारक होते. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानामुळेच भारताला जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर वेगवेगळ्या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डी.एम. वनिक , मधुकर कांबळे यांनी काम पहिले तसेच संदीप शिंदे सर,राजू शिंदे,दीपक येजरे, शशिकांत कांबळे,संजय कांबळे,दत्तात्रय कांबळे यांचे सहकार्य लाभले.

सायंकाळी सर्वांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते, सायंकाळी माणूस प्रस्तुत हाक बाबांची जागर प्रबोधनाचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जयंती संपन्न करण्यासाठी पंचशील तरुण मंडळाचे अध्यक्ष आनंदा कांबळे उपाध्यक्ष भैरव कांबळे,बाळासो कांबळे,आनंदा कांबळे,सागर कांबळे,प्रशांत कांबळे, दादासो कांबळे,विठ्ठल कांबळे,पवन कांबळे, सुनील कांबळे,अक्षय कांबळे प्रथमेश कांबळे,साहिल कांबळे,दशरथ कांबळे, प्रेमचंद कांबळे,रणजित कांबळे,अजय कांबळे व पंचशील तरुण मंडळाच्या सर्व सदस्यांसह बौद्ध बांधवांनी कष्ट घेतले.


## केनवडे येथे भाजपा सदस्य नोंदणी कार्यशाळा

# तालुक्यात ३५ हजार सदस्य नोंदणीचा मानस - संजयबाबा घाटगे

कुडूत्री / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

भारतीय जनता पार्टी हा पक्ष सर्वसामान्य गोरगरीबांना विविध योजनेच्या माध्यमातून सक्षम बनवत आहे. जगभरात भारत देश हा महासत्ता देश बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,यांच्या सह मंत्री महोदय, राज्यकर्ते करत आहेत. आपल्या विधानसभा मतदार संघात भाजपचे प्राथमिक सदस्यता नोंदणी अभियान यशस्वीपणे राबवून येत्या काळात सर्वांनी जवळपास ३५ हजार सदस्य नोंदणीचा टप्पा पुर्ण करण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन माजी आमदार संजयबाबा घाटगे यांनी केले.

केनवडे ता.कागल येथे भारतीय जनता पार्टी च्या सदस्य नोंदणी



कार्यशाळेच्या शुभारंभ प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. गोकुळचे संचालक अंबरिषसिंह घाटगे, भाजपाचे कागल तालुका मंडल अध्यक्ष एकनाथ पाटील,अमर पाटील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी भाजपा सदस्य नोंदणी ऑनलाईन पद्धतीने मोबाईलद्वारे कशी करावी याची माहिती प्रोजेक्टरवरून दाखवण्यात आली. त्यानंतर युवकांना नोंदणीचे प्रशिक्षण या कार्यशाळेद्वारे देण्यात आले.

कार्यक्रमास रणजीत मुडूकशिवाले,के.के.पाटील,आप्पासो पाटील,नानासो कांबळे, तानाजी कुरणे,ऋषिकेश पाटील, डॉ.सी.के.चौगले,मयूर सावर्डेकर,रावसाहेब पाटील,रोहन साबळे,महिला आघाडी तालुका अध्यक्ष सुनिता घराळ, दत्तोपंत वालावलकर,अशोक पाटील, महेश देशपांडे, धोंडिराम एकशिंगे,संजय चिंदगे,ज्ञानदेव पाटील,सोनूसिंह घाटगे,सुजित खामकर,ए.एस.पाटील,दशरथ कामते,अरूण तोडकर,शामराव पोवार,आनंदा करडे,शशिकांत सुळकुडे,प्रविण पाटील,मारूती तोरसे आदी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते. स्वागत सुभाष पाटील यांनी केले आभार युवराज कोईगडे यांनी मानले.

# छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस उपनिरीक्षक, हवालदार यांना उत्कृष्ट सेवेबद्दल पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर ।

## गफार पठाण,पो उप निरीक्षक यांनाही सन्मान चिन्ह जाहीर

फुलंब्री/ सुधाकर जेठे
(दैनिक महाभारत)

पोलीस अधीक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक, पोलिस हवालदार यांना त्यांचे मागील १५ वर्षाच्या सेवा कालावधीत अति उत्कृष्ट शेरे, बक्षीस, प्रशंसापत्र, याद्वारे त्यांनी त्यांचा सेवा अभिलेख उत्कृष्ट ठेवल्यामुळे त्यांना पोलीस महासंचालक महाराष्ट्र यांच्याद्वारे उत्कृष्ट सेवेबद्दल पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी नगर ग्रामिण पोलीस अधिक्षक कार्यालय कक्षेतील १) नारायण भगवान राठोड, पो. उप. नि. सेवा. १७ वर्ष ने. चिकलठाणा (गडचिरोली येथे उत्कृष्ट सेवे बद्दल) २) शकील अहमद रहीम शेख, श्रेणी पो उप नि, सेवा ३५ वर्ष नेमणूक पोलीस मुख्यालय. ३) गफार खान सरवर खान पठाण, श्रेणी पो उप नि, सेवा ३५ वर्ष नेमणूक नियंत्रण कक्ष. ४) खालेद हबीब शेख, सहा. पोलीस उपनिरीक्षक, सेवा ३० वर्ष नेमणूक वायरलेस विभाग. ५) शेख अफसर खाजा, पो. हे. कॉ. सेवा ३१ वर्ष नेमणूक पोलीस मुख्यालय. ६) राजू वामनराव खरात, पो. हे. कॉ. सेवा २९ वर्ष नेमणूक पोलीस मुख्यालय. जिल्हा पोलीस दलातील नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह जाहीर झाल्याबद्दल त्यांचे डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक व अन्नपूर्णा सिंह, अपर पोलीस अधीक्षक यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे .

गफार खान सरवर खान पठाण, श्रेणी पो उप नि, सेवा ३५ वर्ष नेमणूक नियंत्रण कक्ष हे मुळचे महाल किन्होळा



ता फुलंब्री येथील असून त्यांचे स भु हायस्कुल वडोद येथे शालेय शिक्षण झाले आहे . जिद्दी मेहनती व खोडकर हसरा स्वभाव व अनेकांच्या सुख दुःखात नेहमी सहभागी होणे . गरिबीची जाण ठेवून सर्वांना अडल्या वेळी मदत करणे . असा हा खाकीतला माणुस परिसरात सर्व दुर परिचीत आहे . त्याला मिळालेल्या या सन्मानामुळे अनेकांनी त्याचे अभिनंदन केले आहे .

# फुलंब्रीचे विराज शिरसाठ यांना मुंबई विद्यापीठातून पदवी प्रदान

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दैनिक महाभारत)

फुलंब्री चे विराज सुहास शिरसाठ यांनी मुंबई विद्यापीठ येथून पदवी प्राप्त केली, या बाबत सविस्तर माहिती फुलंब्री नगरपंचायतचे प्रथम नगराध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाठ यांचे पुत्र विराज सुहास शिरसाठ यांना मुंबई विद्यापीठ येथून व्यवस्थापनशास्त्र अधिस्नातक ही पदवी प्रदान झाल्याबद्दल फुलंब्री विधानसभेचे मा आमदार तथा राजस्थान राज्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मा केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड, केंद्रीय इको संचालक त्रिंबक शिरसाठ, पार्वताबाई शिरसाठ, आमदार अनुराधा चव्हाण, जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाठ, तालुका अध्यक्ष सांडू अण्णा जाधव, उपाध्यक्ष राम बनसोड, तालुका अध्यक्ष




योगेश मिसाळ, सुचित बोरसे वाल्मिक जाधव गोपाल वाघ, सर्जेराव मेटे, शिवाजीराव पाथ्रीकर, जितेंद्र जैस्वाल, उत्तम ढोके, वाल्मिक जाधव, सुमित प्रधान, भगवान निराशे, संतोष जाधव, गणेश राऊत, अजय शेरकर, राम हापत, नागेश भारद्वाज, सुनील शेवाळे, संतोष आघाडे, सचिन शेरकर, सतीश जाधव, संतोष राऊत तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून व फुलंब्री तालुका आणि शहरातून सर्वांनी सुहास शिरसाठ यांचे पुत्र विराज शिरसाठ यांना शुभेच्छा देत अभिनंदन केले,

# पोलिसांच्या आशीर्वादाने वाई बाजार परिसरात अवैध मटका जोमात

माहूर (दै.महाभारत)

माहूर तालुक्यातील वाई बाजार परिसरात छुप्या पद्धतीने खुलेआम पणे अवैध मटका व्यवसाय जोरात सुरू असून मटक्याच्या आधुन गेलेल्या तरुणांचे संसार कोमात गेल्याचे विदारक चित्र सध्या पहावयास मिळेल आहे. पोलिसांच्या छत्रछायाखाली वाई बाजार गावात अवैध व्यवसायाने जोर धरला असून भाजी मार्केट व चौका- चौकात छुप्या पद्धतीने खुलेआम मटक्याचा बाजार सुरू आहे. पोलिसांबरोबर अवैध व्यवसायिकांचे जाळे किती घट्ट जुळले आहे. याचा प्रत्यय येथे येतो या व्यवसायातून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असून पोलीस, एलसीबी, पथकाकडून, कुठलीच कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून



संताप व्यक्त होत आहे. वाई बाजारात हात मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यात तरुणांची संख्या जास्त आहे.

मात्र बहुतेक तरून झटपट पैसे कमवण्याच्या नादात या अवैध मटका खेळाच्या आधीन गेले असल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहे. तर काहींचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. अनेक तरुण हारजिद्दीच्या तणावाने इतरही व्यसनाच्या आहारी गेले आहेत. मटका चालवणाऱ्यांना पोलिसांच्या आशीर्वादाने व्यवसाय मिळाला असला तरी या व्यवसायाच्या नादी लागलेले इतर व्यवसाय मात्र बरबाद झाल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. मटक्याचा व्यसनाच्या अधिन गेलेल्या तरुणांच्या घरातील सदस्य मात्र चिंताग्रस्त आहे. अवैध मटका या जुगारांचे अल्पवयीन मुलांना मोठ्या प्रमाणात व्यसन जडले आहे. एन शिकण्याच्या वयात ही मुले मटक्याच्या नादी लागल्याने अनेकांचे भवितव्य अंधारातही झाल्याचे जाणवते. अवैध मटका दारूचे व्यसन जडले असल्याने घरातील दररोज होत असलेल्या वादावादी मुळे संसार दोस्त होताना दिसत आहे.

वाई बाजार गाव हे अवैध व्यवसायासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे बाहेरगावचे शौकीन लोकही काम धंदा न करता येते येऊन दिवस दिवस बसत असतात. पोलिसांचा कायमच येथील व्यवसायाला वरदहस्त राहिल्याने अवैध व्यवसायिकांची मुजरी सुरू असते. सोशल मीडियाचा वापर मटका जुगारासाठी केला जातो. मटका व्यवसायाला सोशल मीडियामुळे चांगलीच बळ मिळाले असून पोलिसांपुढे हा व्यवसाय मोडीत घालण्याचे मोठे आव्हान उभे टाकले आहे. सोशलच्या माध्यमातूनच मटका जुगारांचा खेळ खेळला जातो. तसेच रुस्तुमांची संख्या वाढली आहे. यामुळे तरुण पिढी पूर्णपणे वाया जात असून खरंच पोलीस या अवैध मटका चालका विरुद्ध कारवाई करतील का? असा प्रश्न सुज्ञ नागरिकांना पडला आहे.

# अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर टिटवाळ्यात रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर चे उद्घाटन, मान्यवरांची उपस्थिती!




कल्याण / संजय कांबळे
(दै.महाभारत)

कल्याण तालुक्यातील जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष तथा कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रविंद्र घोंडविदे यांच्या कन्या डॉ प्रतिक्षा रविंद्र घोंडविदे यांच्या रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर चे उद्घाटन आज म्हणजे साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक सुंदर मुहूर्तावर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

ठाणे जिल्ह्यातशैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणारे, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा सभापती, संचालक तसेच पत्रकार, मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य, आणि जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष रविंद्र घोंडविदे यांच्या कन्या डॉ प्रतिक्षा रविंद्र घोंडविदे यांनी वैद्यकीय अभ्यासातील बी ए एम एस, एम डी आयुर्वेद,अशा उच्च पदव्या प्राप्त करून टिटवाळा येथील प्रसिद्ध महानगपती मंदिरासमोर रामायु पंचकर्म हॉस्पिटल व वेलनेस सेंटर, नावाचे सर्व सोईनियुक्त हॉस्पिटल सुरू केले, यामध्ये पंचकर्म चिकित्सा, आयुर्वेदिक औषधोपचार, जीवनशैली, डिटॉक्स थेरपी, स्त्रीरोग व प्रसूती उपचार, त्वचारोग व संधिवात उपचार, डायबेटीस व स्थूलता नियंत्रण, मानसिक आरोग्य सुधारणा, आदी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, शिवाय नैसर्गिक व शुद्ध औषधोपचार, स्वच्छ व शांत उपचार कक्ष, रोगमुक्ती व आरोग्य, संवर्धनासाठी विशेष कार्यक्रम, अशी विविध वैशिष्ट्ये या उपचार पध्दतीची असल्याचे डॉ प्रतिक्षा घोंडविदे यांनी सांगितले.

या सोहळ्याला कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, तालुक्यातील विविविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गावचे सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार संजय कांबळे, विलास भोईर, राजू टपाल, तसेच जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य वाघ सर,उप प्राचार्य सोष्टेसर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आदी मान्यवर उपस्थित होते.

## वनसगाव विद्यालयाचे उमेश कुमावत सर यांना पीएच.डी.पदवी प्रदान

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

रयत शिक्षण संस्थेचे वनसगाव तालुका निफाड येथील श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आदर्श शिक्षक कुमावत उमेश अमरनाथ यांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक द्वारे दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी विद्यावाचस्पती (झह.ऊ) ही पदवी जाहीर करण्यात आली आहे. उमेश कुमावत यांना विद्यावाचस्पती पदवी मिळाल्याबद्दल वनसगाव विद्यालयाला नावलौकिक मिळाला असुन रयत शिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

उमेश कुमावत यांनी उच्च प्राथमिक स्तरावर भाषा अध्यापनासाठी संपुट विकसन आणि परिणामकारकता या विषयावर दूर शिक्षणशास्त्र विभागात संशोधन केले. या संशोधनात त्यांनी मोबाईल अप्लिकेशनच्या माध्यमातून इंग्रजी विषयाचे अध्यापन शिक्षकांसाठी अधिक सोपे, मनोरंजक व आंतरक्रियात्मक कसे होईल ? यावर भर दिला. हे संशोधन नाशिक जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांमध्ये करण्यात आले.

श्री.उमेश कुमावत यांना इमरटस प्रोफेसर डॉ. कविता साळुंके यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हा



चेअरमन श्री भगीरथ काका शिंदे, चेअरमन श्री.चंद्रकांत दळवी व जनरल बॉडी सदस्य डॉ.सुजित गुंजाळ तसेच वनसगाव विद्यालयातील स्कूल कमिटी शिक्षण सल्लागार समिती व विविध समित्या व शालेय समिती व संघाच्या वतीने तसेच सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी विद्यार्थिनींनी अभिनंदन केले आहे . शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी अध्यापन सुलभ करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महिलांच्या उत्कर्षासाठी म.बसवेश्र्वरांनी केलेले काम आजही प्रेरणादायक :

अहिल्यानगर / वजीर शेख
(दै.महाभारत)

पाथर्डी येथे अक्षय तृतीया व बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,बाराव्या शतकात समाज व्यवस्था जातीभेदाच्या,स्त्री पुरुष भेदाभेद,वर्णभेद,कर्मकांडाचे अवास्तव स्तोम व स्त्रियांना खालच्या दर्जाची वागणुक पोखरलेली असताना म.बसवेश्वर महाराजांनी समाजातील या दुष्प्रवृत्तींवर प्रहार करून स्त्री - पुरुष समानतेवर फक्त विचार मांडले नाहीत तर आपल्या राज्यात त्याचीअमंलबजावणी करत कृतीमधून ते दाखवुन दिले परिणामी आज आपल्या देशामध्ये सर्वच पातळीवर स्त्रीयांना समानतेची वागणूक दिली जात आहे व याचे श्रेय खऱ्या अर्थाने म.बसवेश्वर महाराजांना जाते असे प्रतिपादन पाथर्डीचे तहसीदार श्री उद्धव नाईक यांनी केले.अक्षय तृतीया व महात्मा बसवेश्वर महाराज जयंती निमित्ताने म.बसवेश्वरांना शासकीय मानवंदना देण्याच्या निमित्ताने तहसील कार्यालय,पाथर्डी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी प्रमुख म्हणुन लिंगायत समाजाचे ज्येष्ठ नेते श्री प्रभाकर अण्णा इजारे,गजानन तारापुरे,लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ,संघर्ष समितीच्या पाथर्डी महिला आघाडी तालुकाध्यक्ष सौ.रेणुका फुलशेटे,दत्तात्रय




टेंभुरकर,संजीव कुमार चेलवे सर,समाज प्रबोधनकार हुमायूनभाई आतार,अभिजीत गुजर,सचिन फुटाणे,शुभम जिरेसाळ,महसूल सहायक दीपक मिरपगार,रविकुमार सानप आदींसह समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी अधिक बोलताना ते म्हणाले की बाराव्या शतकात आपल्या परंपरागत कर्माने समाजात हीन दर्जाची वागणुक मिळत असलेल्या अठरापगड जातींना बसवेश्र्वरांनी लिंगायत पंथाची दीक्षा देत अतिशय सोप्या पद्धतीने ईश्वराच्या भक्तीचा मार्ग दाखवला,स्वतःला कमी लेखणाऱ्या,वेगळे समजणाऱ्या सर्व जाती,पंथाच्या बांधवाना एकत्र करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम त्यांनी केले.म.बसवेश्वर यांच्या समाजहितासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतानाच त्यांनी उपस्थित समाज बांधवांना म.बसवेश्वरांनी दाखवलेल्या समतेच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले.

नगरपरिषद कार्यालयातही प्रथेनुसार कार्यालय अधीक्षक श्री अमोल मदने,भांडार विभागप्रमुख अशोक डोमकावळे,अंबादास साठे यांचे हस्ते म.बसवेश्र्वरांच्या प्रतिमेला हार घालुन मानवंदना देण्यात आली.यावेळी उपस्थित सर्व समाज बांधवांचे वतीने नव्याने होत असलेल्या नगर परिषद इमारतीतील बहुउद्देशीय सभागृहाला म.बसवेश्वर यांचे नाव देण्याची आग्रही मागणी करण्यात आली.

## बहुचर्चित मैत्रेय प्रकरण अंतिम टप्प्यात, मालमत्ता विक्रीची प्रक्रिया वेगात,संघटनेच्या प्रयत्नाला यश !

जालना/लक्ष्मण बिलोरे
( दै.महाभारत)

राज्य आणि राज्याबाहेरील लाखों गोरगरिब गुंतवणूकदारांची कोट्यावधी रूपयांची फसवणूक करणाऱ्या मैत्रेय ग्रुप कंपनीच्या मुंबई सेशन्स कोर्टातील न्यायप्रविष्ट प्रकरणाला गुंतवणुकदार आणि प्रतिनिधी कामगार संघटनेच्या अचूक प्रयत्नाला यश मिळत असून मैत्रेय प्रकरण कोर्टात अंतिम टप्प्यात येवून पोहचले आहे.गुंतवणुकदार आणि प्रतिनिधी संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष संगिता कदम यांचेसह संपूर्ण कार्यकारिणी, तसेच संघटनेच्या कामजावर ठाम विश्वास असलेल्या सभासदांचे गुंतवणुकदारांच्या वतीने सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

विशेष एमपीआयडी कोर्ट आर - २०मध्ये कर्तव्यतत्पर असलेले न्यायमुर्ती




एन.जी.शुक्ला यांची नियुक्ती झालेली आहे,तेव्हापासून मैत्रेय प्रकरणाच्या कामकाजात गती प्राप्त झालेली आहे मैत्रेय प्रकरणाचा निपटारा होईपर्यंत न्यायमुर्ती श्रीयुत शुक्ला साहेबांची बदली होवू नये यासाठी संघटनेच्या अध्यक्ष श्रीमती संगीता कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे मुख्य सचिव, मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश, हायकोर्टातील मुख्य रजिस्ट्रार आणि मुख्य रजिस्ट्रार एमपीआयडी कोर्ट विभागाकडे निवेदनं पाठवून विनंतीपत्र देण्यात आले आहे.संघटनेची हि भुमिका निश्चितच गुंतवणुकदारांच्या हिताची आहे.संघटना अध्यक्ष श्रीमती संगीता कदम यांनी सांगितले की, 'आर्थिक गैरव्यवहार करून सामान्य जनतेची फसवणूक एखाद्या संस्थेकडून केली जात असेल आणि त्यासाठी एमपीआयडी नूसार गुन्हा दाखल असेल तर फसवणुक प्रकरणातील सामान्य गुंतवणूकदारांना त्यांच्या परताव्यासाठी न्यायालयात दाद मागता येते आणि परतावा मिळवता येतो.याच प्रक्रियेतून संघटनेने कोर्टात मैत्रेय प्रकरणात वकिलांची नियुक्ती करून परताव्याची मागणी केली आहे.सेशन्स कोर्टात दाखल असलेल्या मैत्रेय प्रकरणाला गती मिळावी यासाठी संघटनेने हायकोर्टात टाईमबाऊंड अर्ज दाखल करून हे प्रकरण गतीमान केले आहे.त्याचाच परिणाम म्हणून आजमितीस मैत्रेय जप्त मालमत्ता विक्रीची प्रक्रिया वेगात सुरू झालेली असून मैत्रेय प्रकरण अंतिम टप्प्यात येवून पोहचले आहे.त्यामुळे गुंतवणुकदारांना त्यांचा कष्टाचा हक्काचा पैसा परत मिळणारच यात तिळमात्रही शंका नाही.संघटनेच्या यशस्वी कारकिर्दीची माहिती गुंतवणुकदारांपर्यत पोहचवणाऱ्या मैत्रेय प्रकरण संबंधित असलेल्या प्रतिनिधींचेही संघटनेच्या वतीने आभार व्यक्त केले जात आहे.

# वेरूळ येथील श्री हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंग मंदिराच्या भुमिपुजन सोहळा संपन्न

### आमदार प्रशांत बंब यांची उपस्थिती

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

वेरूळ येथील श्री हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंग मंदिराच्या भुमिपुजन सोहळा प.पु. आक्काताई महाराज नाथ आश्रम वेरूळ,ह भ प विनोद महाराज टोपरे व गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. ३०) संपन्न झाले. वेरूळ येथील श्री हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंगाची मुर्ती एका चौथऱ्यावर खुल्या जागेत स्थापन केलेली असल्यामुळे लोकांना विनासायास दर्शन होत असे परंतु अनेक भक्तांना तिथे मंदिर असावे असे वाटू लागले.

हरिहरातमक रुख्मिणी - पांडुरंग मुर्ती म्हणजे शिव आणि विष्णू यांचे एकत्रीकरण झालेलं रुप. वैकुंठ चतुर्दशीला हा रुपदर्शनाचा सोहळा सर्वत्र साजरा केला जातो छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यात



शिव व विष्णू यांचे मिलन असलेले आगळेवेगळे रुप वेरूळ या ठिकाणी पहावयास मिळते. अशा या मंदिराच्या भुमिपुजन प.पु. आक्का महाराज नाथ आश्रम वेरूळ, हभप विनोद महाराज टोपरे व गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते संपन्न झाले. या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार प्रशांत बंब म्हणाले कि आज अक्षय तृतीया आहे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. धर्म, संस्कृती आणि परंपरेला वंदन करणारा अक्षय्य तृतीयेचा हा पावन दिवस, आपल्या आयुष्यात सुख, समृद्धी, आरोग्य व यश घेऊन येवो, ही प्रभु श्री पांडुरंगाच्या चरणी मी प्रार्थना करतो अशा शुभेच्छा मतदारसंघातील सर्व नागरिकांना दिल्या.

चला,मग या पवित्र दिवशी 'सदैव राष्ट्र प्रथम' हा संकल्प पुन्हा नव्याने जागवूया.आपण सर्वजण सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास या मंत्राने प्रेरित होऊन भारतमातेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहूया.प. पु. साध्वी आक्का महाराज नाथ आश्रम वेरूळ यांनीही यावेळी सर्व भाविक भक्तांना अक्षय तृतीयाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.या उद्घाटनप्रसंगी भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,सरपंच प्रकाश मिसाळ, उपसरपंच विजय राठोड,योगेश टोपरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, सुरेश मरकड, योगेश बारगळ, राहुल निकुंभ, सुखदेव ठेंगडे, सागर मातकर, अनिल करपे, राजेंद्र राठोड, महेंद्र दगडफोडे, युवराज बनसोडे, योगेश काळे, नाना मिसाळ, प्रभाकर थोरात, आमदार बंब साहेब यांचे स्विय सहाय्यक गोपाल वर्मा यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते...

## फिजा सय्यद हिची जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी निवड



शिडी / संजय महाजन
(दै.महाभारत)

अकोले येथील आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू फिजा सय्यद हिला अहिल्यानगर जिल्हा क्रीडा पुरस्कार घोषित झाला आहे.जिल्हा क्रीडा अधिकारी खुरगे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सॉफ्टबॉल क्रीडा प्रकारात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सन २०१९ - २० या वर्षीचा जिल्हा क्रीडा पुरस्कार फिजा फत्तू सय्यद हिला घोषित केला आहे.

१मे महाराष्ट्र दिनी अहिल्यानगर येथे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. फिजा सय्यद ही सॉफ्टबॉल खेळाडू असून अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. तिच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार घोषित झाला असून तिचे या बद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पहलगाम घटनेवर वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्याचा जाहीर निषेध प्रा प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी /प्रतिनिधि
(दै.महाभारत)

नुकत्याच पृथ्वीवरील स्वर्ग समजल्या जाणाऱ्या कश्मीरमध्ये ३७० कलम हटविल्यानंतर फार मोठ्या प्रमाणात पर्यटक केवळ भारतातूनच नाही तर जगभरातून येतात. या ठिकाणी आलेल्या पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून पाकी अतिरेक्यांनी गोळीबार करून त्यांचे प्राण घेतले. अशा या अतिरेक्यांना चांगला धडा शिकवावा म्हणून सर्वपक्षीय नेत्यांनी सरकारच्या पाठीशी उभे राहून पाठिंबा दिला ,एवढेच नव्हे तर काही परकीय देशांनी सुद्धा भारताला याबाबतीत समर्थन दिले असे असताना सुद्धा कॉंग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते आणि ब्रह्मपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी जी प्रतिक्रिया दिली आहे ती अत्यंत निंदनीय आहे. ते म्हणतात की अतिरेक्यांनी गोळीबार करताना पर्यटकांचा धर्म विचारला का आणि एवढा वेळ त्यांना असतो का असे बेताल वक्तव्य करून त्यांनी आपली नीच मानसिकता आणि मतांसाठीची लाचारी दाखविली आहे .या घटनेचा निषेध ब्रह्मपुरी येथील शिवाजी चौकात करण्यात आला याप्रसंगी प्रा प्रकाश बगमारे प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चा , ब्रह्मपुरी तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष अरुण शेंडे, ब्रह्मपुरी शहर मंडल अध्यक्ष अरविंद नंदुरकर, जिल्हा सचिव साकेत भानारकर ,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष वंदनाताई शेंडे, माजी न प बांधकाम सभापती विलास विखार, तालुका महामंत्री माजी नगरसेवक मनोज वटे, भाजन भाजयुमो तालुकाध्यक्ष मस्के व शहर अध्यक्ष प्रा सुयोग बाळबुद्धे, ओबीसी मोर्चा जिल्हा महामंत्री तथा माजी नगरसेवक मनोज भूपाल, ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष प्रा डॉ अशोक सालोडकर, भाजयूमो जिल्हा महामंत्री तनय देशकर,शहर महामंत्री प्रा दिलीप जुमडे, गोपाल कावळे, पवन जयस्वाल, अमित रोकडे, रजत थोटे, किरण फटिंग, मनोहर मेश्राम तोरगाव, विनायक दुपारे ,राजू चौधरी व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वडेट्टीवारांचा जाहीर निषेध करून पुतळा जाळण्यात आला.

# सयाजी हॉटेल्सने 'एफोटेल बाय सयाजी, नवी मुंबई' या उपक्रमाच्या शुभारंभासह आपला पाया विस्तारला

### व्यवसाय कार्यक्षमता आणि आरामदायी आरामाचे अखंड मिश्रण

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

सयाजी हॉटेल्सने नवी मुंबईतील एफोटेल बाय सयाजी, नवी मुंबई लाँच करण्याची घोषणा केली आहे. ही एक स्मार्ट आणि समकालीन हॉटेल आहे जी नवी मुंबईच्या सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रदेशांपैकी एकामध्ये निर्दोष आदरातिथ्य प्रदान करते. तळोजा एमआयडीसीमध्ये धोरणात्मकदृष्ट्या स्थित, एफोटेल हे आराम, कनेक्टिव्हिटी आणि सोयी शोधणाऱ्या व्यावसायिक आणि आरामदायी प्रवाशांसाठी डिझाइन केलेले आहे.

हॉटेलमध्ये डिलक्स, प्रीमियम डिलक्स आणि सूट श्रेणींसह ५८ आधुनिक खोल्या आहेत, ज्या विचारपूर्वक तयार केल्या आहेत जेणेकरून ताजेतवाने आणि आरामदायी राहण्याची संधी मिळेल. स्टायलिश इंटीरियरमध्ये कार्यक्षमता आणि सुंदर डिझाइनचे मिश्रण आहे, जे पाहुण्यांना आरामदायी आणि उत्पादक अनुभव देण्याचे आश्वासन देते. एफोटेल, नवी मुंबई हे दोन वेगळ्या जेवणाच्या ठिकाणांचे घर आहे; द क्यूब - एक बहु-पाककृती रेस्टॉरंट जे उत्साही बैठकीमध्ये जागतिक आणि भारतीय चवींचे विविध प्रकार देते आणि गुड ओल्ड डेज - आरामदायी संध्याकाळसाठी परिपूर्ण एक कॅज्युअल लाउंज, जलद जेवण आणि पेयांचा संग्रह देते.

बैठका, परिषदा आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी, एफोटेल बहुमुखी मेजवानी आणि कॉन्फरन्स स्थळे ऑफर करते जी चखउए आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी डिझाइन केलेली आहेत, ते थिएटर-शैलीतील सेटअपमध्ये ५०० पर्यंत पाहुण्यांच्या अंतरंग मेळाव्यांपासून ते मोठ्या कॉर्पोरेट बैठकांपर्यंत आहे.

लाँचिंगबद्दल बोलताना, एफोटेल बाय सयाजीचे संचालक ऑपरेशन्स काशिफ मेमन म्हणाले: आम्हाला एफोटेल बाय सयाजीसह नवी मुंबईत विस्तार करण्यास उत्सुकता आहे. आमचे उद्दिष्ट असा हॉटेल अनुभव तयार करणे आहे जो व्यवसाय कार्यक्षमता आणि विश्रांतीच्या आरामाचा समतोल साधेल. औद्योगिक आणि व्यावसायिक केंद्र म्हणून नवी मुंबईचे वाढते महत्त्व पाहता, आम्हाला विश्वास आहे की एफोटेल उत्तम किमतीत दर्जेदार आदरातिथ्य शोधणाऱ्या प्रवाशांसाठी पसंतीचा पर्याय बनेल.

उत्साहात भर घालत, सयाजी हॉटेल्स लिमिटेडचे जमील सय्यद म्हणाले: एफोटेल नवी मुंबईच्या उद्घाटनासह, आम्ही या शहरात सयाजीच्या आदरातिथ्याचा सर्वोत्तम वारसा आणण्यासाठी वचनबद्ध आहोत. खोल्यांपासून ते जेवणाच्या ठिकाणांपर्यंत




आणि कार्यक्रमाच्या जागांपर्यंत - प्रत्येक तपशील विचारपूर्वक डिझाइन केला आहे जेणेकरून आमच्या पाहुण्यांना आराम आणि वैयक्तिकृत सेवेचे परिपूर्ण मिश्रण मिळेल. आमच्या सर्व पाहुण्यांसाठी घरापासून दूर एक विश्वासार्ह घर बनण्यास आम्ही उत्सुक आहोत.

येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून फक्त ८ किमी अंतरावर आणि खारघर, सीबीडी बेलापूर आणि वाशीच्या जवळ असलेले, एफोटेल नवी मुंबई औद्योगिक क्षेत्रे आणि कॉर्पोरेट पार्कशी अखंड कनेक्टिव्हिटी देते, ज्यामुळे ते व्यवसाय आणि विश्रांती भेटींसाठी एक आदर्श आधार बनते.व्यवसायाच्या असाइनमेंटसाठी भेट असो किंवा आठवड्याच्या शेवटी सुट्टी असो, एफोटेल बाय सयाजी, नवी मुंबई, असा अनुभव देते जिथे लक्ष देणारी सेवा समकालीन राहणीमानाला भेट देते.